**<u>ठळक बातम्या</u>**

- तीन दिवसांच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मेलबर्नला पोहचले

- देशभरात काल पर्यंत ३५१ लाख हेक्टर जमिनींवर खरिपाच्या पेरण्या पूर्ण

- पिंपरी चिंचवडमध्ये कचऱ्याचा डोंगर इमारतीवर कोसळला, ढिगाऱ्याखाली १६ जण अडकले असल्याची भीती

- संघर्ष संपवण्यासाठी इराणबरोबर केलेला करार संपुष्टात आल्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार ६७७ अंकांची घसरण

**<><><><><>**

तीन दिवसांच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मेलबर्नला पोहचले. ऑस्ट्र्लियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्याशी चर्चा करण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधण्याची संधीही आपल्याला मिळेल, असं त्यांनी म्हटलं आहे. या दौऱ्यात ते ऑस्ट्रेलियाच्या प्रधानमंत्र्यांबरोबर भारत-ऑस्ट्रेलिया वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होणार असून, 'भारत-ऑस्ट्रेलिया सीईओ फोरम'मध्येही सहभागी होणार आहेत.

मोदी यांनी आज इंडोनेशियाचा दौरा संपवण्याआधी या प्राचीन शिवमंदिर परिसरात लहान मोठी २२४ मंदिरं आहेत. त्यातली सुमारे २०० मंदिरं भग्नावस्थेत आहेत.

**<><><><><>**

यंदाच्या पावसाळ्यात एलनिनो प्रभावाची शक्यता लक्षात घेऊन त्या दृष्टीनं तयारी करण्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज नवी दिल्ली इथं एक उच्चस्तरीय बैठक घेतली. बैठकीनंतर पत्रकार परिषदेत चौहान यांनी सांगितलं, की गेले काही दिवस देशभरात जोरदार पाऊस होत असून पाणीटंचाईग्रस्त जिल्ह्यांची संख्या २६२ वरुन १७८ झाली आहे. काल पर्यंत ३५१ लाख हेक्टर जमिनींवर खरिपाच्या पेरण्या पूर्ण झाल्या असून यंदा पेरणीक्षेत्र ४४२ लाख हेक्टर आहे. मोसमी पावसाचं आगमन लांबल्यामुळे तूर, सोयाबीन, कापूस आणि इतर पिकांच्या पेरणीवर परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांनी मका, बाजरी, आणि मूग अशा कमी पाण्यावर लौकर वाढणाऱ्या पिकांना प्राधान्य द्यावं, असं आवाहन कृषीमंत्र्यांनी केलं.

**<><><><><>**

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, महाराष्ट्र सुधारणा विधेयक आज विधान परिषदेत संमत झालं. या विधेयकामुळे कुठल्याही नागरिकावर अन्याय होणार नाही याची ग्वाही देत संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठवण्याची गरज नसल्याचं गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्ट केलं. विधेयकातल्या तरतुदींना विरोध करत विरोधकांनी हे विधेयक मंजूर करताना सभात्याग केला. डिजिटल माध्यमातून देशाच्या आणि राज्याच्या विरोधात मतप्रदर्शन करणाऱ्या साहित्यावर बंदी आणण्याची तरतूद या विधेयकात आहे, असं कदम यांनी आज सांगितलं. आतापर्यंत छापील स्वरूपात असलेल्या साहित्यावर बंदी घालता येत होती, असं त्यांनी स्पष्ट केलं होतं. याशिवाय गुन्हा करू शकतो अशी शक्यता असलेल्या व्यक्तींना प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून २४ तासाऐवजी १५ दिवस ते १ महिना कालावधीसाठी ताब्यात घेण्याची तरतूद यात आहे. त्यासाठी न्यायालयाची परवानगी आवश्यक असेल असं त्यांनी स्पष्ट केलं. भारतीय दंड संहितेत अशा प्रकारची तरतूद होती, मात्र भारतीय नागरिक सुरक्षा संहितेत ही तरतूद नसल्यानं या विधेयकात ही तरतूद केल्याचे गृह राज्यमंत्री म्हणाले.

<><><><>

मुंबईमध्ये एकात्मिक पूरनियंत्रणासाठी १३ हजार कोटी रुपयांचा आराखडा राज्य सरकारनं केंद्राला सादर केला असून त्याद्वारे मुंबईत ३७० हॉटस्पॉट्स ठरवले आहेत. पाऊस आणि भरती एकाच वेळी असताना या ठिकाणांवर साचणारं पाणी अर्ध्या तासात बाहेर कसं काढता येईल, यावर या आराखड्यात भर दिला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. राज्यात पावसामुळे झालेल्या हानीबाबत त्यांनी आज निवेदन दिलं. मिसिंग लिंकजवळ दरड कोसळल्याप्रकरणी, इथली सुरक्षाव्यवस्था आणखी भक्कम कशी करता येईल, याबाबत आआयटी मुंबईच्या तज्ज्ञांकडून शिफारशी मागवल्या आहेत, असंही ते म्हणाले. मुंबई शहराला होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी गारगाई धरण येत्या ३ वर्षांत पूर्ण करायचं आश्वासन त्यांनी दिलं. मुंबई खड्डेमुक्त करणं, तसंच वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सुरू असलेल्या विविध कामांची माहिती त्यांनी दिली.

<><><><>

आळंदीमध्ये ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचं आज पंढरपूरकडे प्रस्थान झालं. गेल्या चार-पाच दिवसांपासून उद्भवलेल्या पूरसदृश परिस्थितीमुळे आळंदीकडे जाणारे चारही पूल अद्यापही इंद्रायणीच्या पाण्याखाली आहेत. त्यामुळे प्रस्थान सोहळा कसा होणार, याबाबत साशंकता होती. मात्र नियोजित वेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता प्रस्थान सोहळ्यातील सर्व विधींना सुरुवात झाली आणि थोड्यावेळापूर्वी पालखीनं प्रस्थान केलं.

<><><><>

पिंपरी चिंचवडमध्ये मोशीजवळ कचऱ्याचा डोंगर एका प्रशासकीय इमारतीवर कोसळला. यात सुमारे १६ जण अडकल्याची भीती व्यक्त होते आहे. कचऱ्यावर प्रक्रीया करणाऱ्या कंपनीचं काम या इमारतीतून चालायचं. एनडीआरएफसह अन्य

यंत्रणा याठिकाणी बचावकार्य राबवत आहेत. गरज पडली तर लष्कराची मदतही घेतली जाणार आहे.

<><><><>

अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांमधला तणाव तूर्तास वाढला असून संघर्ष संपवण्यासाठी इराणबरोबर केलेला करार संपुष्टात आल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.सध्यातरी इराणशी कोणतीही चर्चा करायला आपण तयार नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे.आमचे प्रतिनिधी इराणशी वाटाघाटी करत राहतील परंतु त्यातून काही निष्पन्न होईल का?अशी शंका त्यांनी व्यक्त केली. तुर्कीयेची राजधानी अंकारा इथे नाटो राष्ट्रांच्या शिखर संमेलनादरम्यान राष्ट्राध्यक्ष ट्रम्प बातमीदारांशी बोलत होते. दरम्यान,इराणच्या हॉर्मोजगन प्रांत आणि माहशाह  शहरावर अमेरिकेच्या सैन्यदलानं केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणनं अमेरिकेच्या ८५ सैन्यतळांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोननं हल्ले चढवले.यातील दोन सैन्यतळ  बहारीन आणि कुवैत मध्ये आहेत.होरमुझ च्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या व्यापारी जहाजांवर इराणनं केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या हवाई दलानं इराणच्या ८० ठिकाणांवर हल्ले केले होते.आंतरराष्ट्रीय सामुद्रिक वाहतुकीवर हल्ले करणाऱ्या इराणची क्षमता कमी करण्यासाठी ही कारवाई केल्याचं अमेरिकेचं म्हणणं आहे.   धोक्याचा इशारा मिळताच सुरक्षित स्थळी जाण्याचं आवाहन बहारीननं आपल्या नागरिकांना केलं आहे.

<><><><>

भू-राजकीय तणावाचा परिणाम आज भारतीय शेअर बाजारांवर दिसून आला. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज १ हजार ६७७ अंकांनी खाली आला आणि ७६ हजार ५०४ वर बंद झाला. राष्ट्रीय शेअरबाजाराचा निफ्टी ५१७ अंकांनी खाली आला आणि २३ हजार ८८२वर बंद झाला. दिवसाच्या उत्तरार्धात इराण बरोबरचा

संघर्ष संपवण्यासाठीचा करार संपुष्टात आल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केल्यानंतर बाजारात जोरदार घसरण झाली. परकीय चलन बाजारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ६० पैशांनी घसरला आणि तो ९५ रुपये ५६ पैसे या पातळीवर बंद झाला.

**<><><><><>**

डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं आज ओडिशातल्या चांदीपूर इथल्या एकात्मिक चाचणी तळावर पिनाक नावाच्या देशी बनावटीच्या लांब पल्ल्याच्या अग्निबाणाची यशस्वी उड्डाण चाचणी केली. या अग्निबाणाचा किमान पल्ला ६० किलोमीटर इतका असून त्याहून मोठा पल्ला गाठणारे विविध पिनाक अग्निबाण विकसित करण्यात येणार असल्याचं असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी याबाबत डीआरडीओचं अभिनंदन केलं असून या अग्निबाणाबाबतचं यश हा भारतानं गाठलेला मोठा टप्पा असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

फीफा विश्वचषक फूटबॉल स्पर्धेतल्या उपान्त्यपूर्व फेरीतल्या लढती निश्चित झाल्या आहेत. येत्या शुक्रवारी पहिली लढत फ्रान्स आणि मोरोक्कोच्या संघात होणार आहे. सामना भारतीय वेळेनुसार पहाटे दीड वाजता सुरु होईल. शनिवारी स्पेनची लढत बेल्जियमशी होईल. येत्या रविवारी नॉर्वे विरुद्ध इंग्लंड हा सामना रंगेल, दुसरा सामना गतविजेत्या अर्जेंटिना बरोबर स्विट्झर्लंडचा असणार आहे.

**<><><><><>**

हवामान विभागानं पालघर, रायगड या जिल्ह्यांना तसंच नाशिक, पुणे आणि साताऱ्यातल्या घाट परिसराला उद्या सकाळपर्यंत मुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. याठिकाणी वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस होईल, असा अंदाज आहे.

याशिवाय मुंबई, ठाणे, नाशिकमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे. त्यामुळं काही ठिकाणी वादळी वारे आणि जोरदार पावसाची शक्यता आहे.

//<><><><><>//